# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक १६-०३-२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १६-०३-२०१२ रोजी (का.क्र.प.३७) मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील . प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४.०० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त (म)श्री.अजय चारठाणंकर ,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स.श्री.शिंदे राजु रामराव
३. स.स.श्री.डॉ.खान जफर अहेमद
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
७. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
८. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
११. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१२. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१३. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१४. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१५. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
१६. स.स.श्री.बोराडे रामदास काशीनाथ
१७. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
१८. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
१९. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२०. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२१. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
२२. स.स.श्री. खान जहांगीर अब्बास
२३. स.स.श्रीमती जरीना म.जावेद
२४. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद

२५. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान
२६. स.स.श्री.मिर्झा सलीम बेग मिर्झा हमीद बेग
२७. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२८. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
२९. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
३०. स.स.श्रीमती परवीन खैसर खान
३१. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३२. स.स.श्री.मुजीबखान मीर आलमखान
३३. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान
३४. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३५. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
३६. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
३७. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
३८. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
३९. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४०. स.स.श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
४१. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४२. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४३. स.स.श्री.खान आगा मिया खान
४४. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४५. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
४६. स.स.श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत
४७. स.स.श्रीमती काळे शोभा पुखराज
४८. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
४९. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
५०. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५१. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५२. स.स.श्रीमती निलाबाई देविदास जगताप
५३. स.स.श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
५४. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान

५५. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
५६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
५७. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
५८. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
५९. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६०. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६१. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
६२. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
६३. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
६४. स.स.श्री.अब्दुल सिकंदर अब्दुल साजेद
६५. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
६६. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
६७. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
६८. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
६९. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
७०. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. स.स.श्री.अभिजीत भास्करराव देशमुख
०४. स.स.श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

श्री.सुशिल खेडकर :माजी नगरसेवक श्री.नारायण फत्तेलष्कर तसेच श्री.सलीम कुरैशी यांचे नुकतेच निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

डॉ. जफर खॉन :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याच वेळी स्व.नारायण फत्तेलष्कर तसेच पै. सलीम कुरैशी यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

चर्चा :

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :मार्च अखेर असल्याने विकास कामाची लगबग सुरू आहे बजेटमधील कामे कमी केले ते करणार नाही असे आपण म्हटले होते त्यावर आपण ठाम राहावे जवाहर कॉलनी भागात एकही काम केले नाही. जनगणनना व निवडणुकीच्या कामासाठी कर्मचारी दिल्याने व काहीच्या बदल्या

केल्याने पाहिजे तेवढी कामे होत नाही अंदाजपत्रक तयार झाले नाही जे झाले ते अदयाप टेंडरसाठी गेले नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.महेश माळवंतकर :१ महिण्यापासून सिडको हडको माझ्या वार्डातील लाईट बंद असुन एजन्सीला व अधिकारी यांना कल्पना देऊनही कार्यवाही होत नाही. विचारणा केली तर एजन्सीला सांगतो अशी उत्तरे मिळतात जनता कर भरते त्यांना अशी उत्तरे देणे योग्य नाही ०२ दिवसात लाइट चालू होणार का? ज्यांनी नवीन टेंडर भरले त्यांना वर्क ऑर्डर दिली का ? टि.व्ही सेन्टर ते एस पी कार्यालयाकडे जाणा-या रस्त्यावर किर्ती मंगलकार्यालया समोरील रस्त्यावरील सर्व लाईट बंद आहे त्या रस्त्यावर १ महिण्यात ७-८ अपघात झाले या सर्व ठिकाणचे लाईट केंव्हा चालू करणार आहे

श्री.अफसर खॉन :तीन वर्षासाठी लाईटचे टेंडर दिले किती लाईट फिटींग करणार होते? किती लाईट लावले मागणी केल्यास एक चोक, एक-एक लाईट घेवून येतात एक लावल्यानंतर दुसरा बंद होतो कोठून खरेदी करतात अशा ठेकेदारास काम देवू नये.विचारलेली माहिती दयावी.

श्री.अनिल जैस्वाल :२ वर्षापासून लाईटचे काम एजन्सी करते १७ वार्डात सर्वे करून जेथे लाईट बंद असतील ते लावण्याची अनेकदा मागणी केली लाईट बंद आहे अधिका-यांचा एजन्सीवर वचक नाही. जी एजन्सी काम करते त्यांना काम देवू नये ४ वार्ड मिळून एका एजन्सीला काम देण्याचे ठरले वार्डवाईज टेंडर का काढले जात आहे.अनेक भागात सहा महिण्यापासून लाईट बंद ठोस निर्णय होत असेल तर सभा घ्यावी नसता मा.आयुक्त जेंव्हा येतील तेंव्हा सभा घ्यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :मुकूंदवाडी रेल्वेस्टेशन ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पर्यंतच्या रस्त्यावर नेहमी अंधार असतो रात्री ट्रेन थांबते लोकांना अधारांत जा-ये करावी लागते. वार्डात सुध्दा ५० टक्के लाईट बंद लाईट लावण्या बाबत आश्वासन मिळतात.काम होत नाही.

श्री.सुशिल खेडकर : सर्वच वार्डात लाईटची समस्या आहे किती दिवसात कार्यवाही होणार बजेटमधील कामे कमी केली का मा.आयुक्त उपस्थित नाही खुलासा मिळणार नाही त्यामूळे सभा तहकूब करावी.

श्री.गिरजाराम हळनोर :अनेक सदस्यांचे आजच्या सभेत महत्वाचे प्रश्न आहे. बजेटमधील कामे कमी करणार मा.आयुक्तांचे पेपरला स्टेटमेंन्ट आले परंतु यास सर्वांचाच विरोध असणार आहे.वाढीव कामासाठी जो निधी लागतो त्यासाठी उत्पन्न वाढवावे.शासनाकडून अनुदान मिळण्यासाठी प्रयत्न करावे परंतु बजेट मधील विकास कामे कमी करू नये गेल्या दोन वर्षात ५ लक्षची वार्डात कामे झाली नाही.विकास कामे कमी होणे हे सदस्यांना मान्य नाही मा.आयुक्ताकडून याचा खुलासा घ्यावा पाणी, लाईटचीही समस्या आहे मा.आयुक्तांची उपस्थित राहणे आवश्यक होते ते नाही विनंती की, मा.आयुक्त येतील तेव्हा सभा आयोजित करावी

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :वसंतराव नाईक कॉलेजच्या बाजूला सिडको बसस्टॅण्ड जवळील चौकात ६ महिण्यापासून हायमास्ट लाईट का बंद आहे. |
| श्री.सुरेंद्र कुलकर्णी | :त्रिमुर्ती चौक, उस्मानपूरा ,गजानन महाराज मंदीर चौक,सावरकर चौक तसेच सुतगिरणी या भागातील हायमस्ट अनेक दिवसापासून बंद का आहे. |
| शहर अभियंता | :लाईटच्या बाबतीत प्रशासन दखल घेईल माहिती देण्यात येईल स.सदस्य श्री.प्रमोद राठोड यांनी म्हटलेल्या चौकातील हायमस्ट बाबत लगेच कार्यवाही करण्यात येईल. |
| मा.महापौर | :जे प्रश्न विचारले त्या बाबत ०२ दिवसात संबधीत अधिकारी यांनी कार्यवाही करावी मा.आयुक्त यांना मा.मुख्य सचिव यांनी पर्यटक या विषयाच्या बैठकीला तातडीने बोलविले असल्याने ते आजच्या बैठकीला उपस्थित नाही तसे त्यांनी कळविले तसेच चर्चा होवून अपेक्षीत खुलासा आज होत नाही स सदस्यांच्या भावना लक्षात घेता आजची सभा तहकूब करण्यात येते. |

या बरोबर आजची सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगरसचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद